PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 2, ISSUE 1

# 'ग्रामगीतेतील 'स्त्री' शिक्षणविषयक विचार'

डॉ. गजानन भाऊराव मुंधे
**सहयोगी प्राध्यापक.**
**आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (आढाव)**
**ता. मनोरा जि. वाशीम**
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना :-

महाराष्ट्राची पुरोगामी महाराष्ट्र म्हणून आज जी ओळख आहे. त्या महाराष्ट्रात पुरोगामी विचार रुजविण्याचे कार्य मध्ययुगीन कालखंडात संतानी समतेचा व सर्वधर्म समभावाचा पुरस्कार करून कीर्तन-प्रवचनाच्या व साहित्याच्या माध्यमातून प्रकटपणे केल्याचे दिसते. हाच समानतेचा विचार पुढे अव्वल इंग्रजांच्या कालखंडात महात्मा फुल्यांनी महाराष्ट्राच्या मातीत समाजपरिवर्तनाच्या चळवळी उभारून त्याचा पाया भक्कम केला. भारतातील परंपरागत समाजसंस्थाच्या विरुद्ध बंड करून त्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला. त्यांच्या या कार्याविषयी धनंजय कीर लिहितात, " भारतीय परंपरेने स्त्री - शूद्रांना एकाच दावणीत बांधून स्त्रियांना शिक्षणापासून वंचित केले होते. त्यांना अज्ञानांधकारात पिचत ठेवले होते. जोतीरावांनी भारतीय स्त्री-शूद्रास शिक्षणाचे दरवाजे खुले व्हावे, म्हणून सर्वप्रथम जीवाचे रान केले. स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत जोतीरावांनी जे युगप्रवर्तक कार्य केले त्या विषयी तत्कालीन परकी सरकारनेही त्यांचा सत्कार केला," १ फुल्यांनी सावित्रीबाईंना शिकवून पहिली भारतीय शिक्षिका घडवली फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीतून पुढे आलेल्या ताराबाई शिंदे या महिलेने १८८२ साली 'स्त्री- पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहून स्त्री- पुरुष समानतेवर कणखर भूमिका मांडली.

स्त्री ही मुक्तीच्या मार्गातील धोंड आहे. म्हणून मनुस्मृती, पुराणादी ग्रंथातून तिला कायमाची बदिस्त करून टाकली. चुल नि मूल यातच तिला शतकानुशतके अज्ञानांधकारात खितपत ठेवले. महात्मा फुल्यांनी मनुस्मृती - पुराणातील या भाकडकथावर प्रहार करून

स्त्रियांना प्रथम मुक्तीचा मार्ग दाखविला. स्त्री शिक्षणाच्या कार्यास सुरवात करून स्त्री शिक्षणाचा पाया घातला. स्त्री शिक्षणाविषयीचे फुल्यांचे हे कार्य स्त्रियांच्या एकंदरीत प्रगतीसाठी किती महत्त्वाचे होते, हे आज लक्षात येते.

**भूमिका** :- इंग्रजी अंमल असलेला काळात फुल्यांनी केलेल्या या कार्यास पुढे स्वातंत्र्योरकालखंडात अनेक समाज सुधारकांनी. संतानी पुढे नेल्याची दिसून येते. फुल्यांच्या या कार्यास राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीता या ग्रंथातून खेड्या पाड्या पर्यंत पोहचवून स्त्री शिक्षणा विषयीचा जागर निर्माण केला. राष्ट्रसंतानी आपल्या ग्रामगीतेतून मांडलेल्या स्त्री शिक्षण विषयक विचारंचा शोध प्रस्तुत निबंधातून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या शोध लेखनासाठी ग्रामगीता या ग्रंथातील ओव्यांचा आधार घेतला आहे.

‘ म्हणती स्त्री ही कार्यात धोंड | म्हणोनी तिच्या प्रगतीत पाडावा खंड |
ऐशापरी जाणोनि वाढवती दगड | मार्गी आपुल्या || (२०.४७)

संतपरंपरेला सामनतेचा वारसा असला तरी काही संतानी स्त्री विषयी वरील भूमिका मांडलेली दिसून येते. मनुस्मृती, पुराणांचा पगडा व त्यातून निर्माण झालेल्या मानसिकतेला राष्ट्रसंतानी धक्का दिला. स्त्री ही पुरुषाच्या मार्गातील धोंड नसून स्त्री ही उन्नती साधणारी आहे. हा विचार कणखरपणे मांडून महात्मा फुल्यांच्या सामनतेचा विचरांना पुढच्या पिढी पर्यंत पोहचविण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

“ जिच्या हाती पाळण्याची दोरी | तीच जगाते उद्धरी |
ऐसी वर्णिली मातेची थोरी | शेकडो गुरु हुनिहि || (२०.३)

जगाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य स्त्री मध्ये आहे. हजारो वर्षाचि पुरुषी मानसिकता आता तरी बदला असे राष्ट्रसंत निक्षून सांगतात.

‘ काही पुराणी सांगितली दीक्षा | करावी स्त्री जातीची उपेक्षा |

‘स्त्री’ला चूल नि मूल यातच बंधिस्त करून ठेवले. तत्कालीन स्त्रियांही देव-धर्म यातच धन्यता मानून जगत राहिल्या. पुराण पंडितांच्या स्त्री विषयीच्या मानसिकतेला राष्ट्रसंतानी मात्र धक्का दिला.

" काय स्त्रियांनी नाही लिहिले वेद? | काय नाही केला ब्रम्हवाद ?||
नाना विद्याकला - भेद | यात प्रवीण कितीतरी || ५० ||

स्त्रियांना ज्ञानापासून वंचित ठेवण्याचा मानसिकतेला निरुत्तर करून -

स्त्रियांना त्यांच्या अस्तित्वाची ओळख राष्ट्रसंत करून देतात. प्राचीन भारतातील स्त्रियांचे दाखले देऊन आजच्या स्त्री वर्गाचे ते डोळे उघडतात. स्त्रियांमधे आत्मभान निर्माण करण्याचे राष्ट्रसंताचे हे कार्य म्हणूनच महत्वाचे ठरते.

या पुढे जावून राष्ट्रसंत स्त्रियांना कोणते शिक्षण द्यावे या विषयी विचार मांडताना म्हणतात,

" महिलांच्या आंतरिक गुणांचा विकास | करील ऐसे शिक्षण खास|
जरि दिले जाईल त्यास | तरीच भावी जग पालटे ||८४ || २० अ

स्त्रीयामधील आंतरिक गुणांचा विकास व त्या माध्यमातून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल. असे झाले आणि तिला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणल्यास जग पालटल्या शिवाय राहणारा नाही. राष्ट्रसंताच्या त्या वेळच्या विचारांचा परिणाम आज समस्त स्त्री- पुरुष वर्गापुढे आहे. हे वगळे सांगावे लागत नाही.

संत, समाजसुधारक हे काळाची पावले ओळखणारे द्रष्टे पुरुष असतात. त्यांच्या द्रष्टेपणामुळे महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाचा पाया रोविला गेला. स्त्री विकासाशिवाय समाज व राष्ट्राचा विकास शक्य नाही. त्या करिता शिक्षणाची दारे तिला उघडी व्हावी एवढेच नव्हे तर ती एक चळवळ बनून खेडोपाडी पोचावी हा प्रयत्न राष्ट्रसंतांनी ग्रामागीतेच्या माध्यमातून केला आहे.

समाज विकासज्यास आवडे | त्याने शिकवावे मुलींना धडे |
लिहिता-वाचता येईल एवढे | तरी शिक्षण आवश्यक ||८६|| अ.२०

केवळ मुलांनाच न शिकवता मुलीनांही शिकवावे हा आग्रह ते धरतात.

" मुलांस विविध उच्च ज्ञान द्यावे| तैसेची मूलीनांही शिकवावे |
हेळ सांड करू नये हे जाणावे | समाजाने ||९१|| अ.२०

मुलगा हा वंशाचा दिवा म्हणून त्या कडे विशेष लक्ष पुरविले जाते. अगदी आजही बहुतांश ठिकाणी ही वागणूक दिसून येते. परंतु राष्ट्रसंत समान संधी व समान शिक्षणाचा आग्रह धरून स्त्री शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करतात.

स्त्री-पुरुष भेद न करता शिक्षणाची समान संधी हे मुख्य सूत्र राष्ट्रसंताच्या स्त्री विषयक उद्धाराचे खरे गमक होय. समाजाला या साठी काही उपायही राष्ट्रसंत सुचवितात. ते म्हणतात -

" जैसी मुलांची संघटीत सेना | तैसी स्त्रीयांची असावी संघटना |
आपुल्या सुखदु:खाच्या भावना | प्रकटवाव्या सभा- सम्मेलनी || १०२|| अ.२०

मुलींच्या संघटना तयार करून त्यांना स्वतंत्र विचार व्यक्त करू द्यावे. संघटनेच्या माध्यमातून स्त्रीशक्तीचा जागर करून त्यांना व्यक्त होता यावे यासाठी ते म्हणतात-

" माझे म्हणणे श्रोतयाते |जे जे सुख असेल पुरुषांते |
महिलांसाठी असावे अभिन्नपणे ते| स्वातंत्र्य सुखसाधन || १०७|| अ.२०

स्त्री- स्वातंत्र्याला अत्यंत महत्व देणाऱ्या राष्ट्रसंतानी काळाची पाऊले ओळखली होती. स्त्रियांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल करण्यासाठी राष्ड्रसंतानी शास्त्राला झुगारून देणाचा सल्ला दिला.

शास्त्र, वेद, पुराणांनि, एकाच रथाची दोन चाके असलेल्या स्त्री-पुरुषातील एकाच चाकाला महत्त्व दिलेले होते. परंतु राष्ट्रसंतानी आपल्या ग्रामागीतेतून दुसऱ्या चाकाचे महत्त्व विषद करून लोकापर्यंत ते विचार पोहचविले ग्रामाग्रामात एक चळवळ उभी केली. त्या माध्यमातून स्त्रीशिक्षणाचा, स्वातंत्र्याचा व समानतेचा हक्क स्त्री ला मीळवून देण्यात राष्ट्रसंतानी ग्रामगीतेच्या माध्यमातून केलेले कार्य महात्मा फुल्यानंतर स्वातंत्र्योत्तर कालखंडात अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**निष्कर्ष** : - 1) वेद- पुराण, मनुस्मृतीने स्त्रियांना शिक्षण नाकारले होते. त्या विचारांना प्रखर विरोध करून राष्ट्रसंतानी स्त्री शिक्षणाचे महत्त्व ग्रामगीतेतून मांडले.

२) स्त्रियांनी संघटीत होऊन स्वविकास साधण्याचे आवाहन त्यांनी केल.

३) मुलगा- मुलगी असा भेद न करता मुलांप्रमाणेच मुलींनाही उच्च शिक्षण देऊन समाजोन्नती साधावी या साठी ते आग्रह धरतात.

४) महात्मा फुल्यांच्या स्त्री शिक्षण विषयक विचारांना राष्ट्रसंतानी आपल्या ग्रामग्रीतेच्या माध्यमातून खेड्या- पाड्यापर्यंत पोहचविले.

५) स्त्री शिक्षणा विषयीची पुरुषी मानसिकता बदलविण्याचे महत्त्वाचे कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महारांजानी आपल्या ग्रामागीतून केले.

## सारांश -

भारतीय स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे मा. फुले, सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाचा चळवळीला पुढे ताराबाई शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रूपाने शसक्त वारसा लाभला. स्वातंत्र्योत्तर काळात या विचारांना व चळवळीला भक्कमपणे खेड्या- पाड्यापर्यंत पोहचवून स्त्री शिक्षणाच्या यज्ञाला अधिक ज्वलंत करून स्त्रियांमध्ये आत्मभान निर्माण करण्याचे कार्य राष्ट्रसंतानी केले. राष्ट्रसंतानी ग्रामगीतेतून "स्त्री शिक्षणाला" दिलेले महत्त्व आज स्त्रियांच्या प्रगतीस हितकारक ठरले आहे.

राष्ट्रसंतांच्या स्त्री विषय विचारावर भाष्य करतांना प्रा. कुसवामवती देशपांडे म्हणतात," ग्रामगीते मध्ये सर्वसाधारपणे स्त्रीला समाजात कसे वागविले जाते. व वस्तुतः तिची पदवी काय असावयास पाहिजे याची जी चर्चा आली आहे. ती आश्चर्यकारक आहे,"२

एकंदरीत राष्ट्रसंताचे स्त्री शिक्षण विषयक विचार हे पुराणमतवादी व पुरुषी मानसिकतेला धक्का देवून स्त्री जीवनात शिक्षणाची नवी पहाट निर्माण करणारे आहे.

## संदर्भ टीपा :-

1) महात्मा फुले, समग्र वांङ्मय,संपादक, धनंजय कीर, महाराष्ट्र राज्य. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई आवृत्ती १९९१ - प्रस्तावनेतून. पृ. २७

२) ग्रामगीता, संपा. सुदामाजी सावरकर. श्रीगुरुदेव ग्रामीण प्रतिष्टान, गुरुकुंज आश्रम, पंचविसावी आवृत्ती, २०१०. पृ, क्र, २८

डॉ. गजानन भाऊराव मुंधे